ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २६ | पुणें, बुधवार तारीख २१ डिसेंबर, १९६० | अंक ४६

Pratibha-60-6

पहिली मुलगी झाली कीं, 'पहिली बेटी सोन्याची पेटी' म्हणून आनंद व्यक्त करतात. तरी पण पुष्कळांच्या मनाला मुलगी झाली कीं, थोडी तरी रुख रुख लागतेच. त्याला कारण तिच्या लग्नाची— म्हणजे लग्नाच्या वेळीं लागणाऱ्या खर्चाची-काळजी. ही काळजी दूर करण्याचा उत्तम उपाय म्हणजे 'आयुर्विमा'. आज विमा उतरवून मुलीच्या लग्नाच्या वेळीं ठराविक रक्कम निश्चित मिळण्याची व्यवस्था करतां येते. अेखादे वेळीं दुर्दैवानं तुम्ही मध्येंच कुटुंबाला पारखे झालांत तरीहि ठरलेल्या वेळीं ठरलेली रक्कम मिळणारच.

विमा अेजंट तुम्हांला किती हप्ता पडेल हे समजावून सांगेल.

**आयुर्विम्याला दुसरा पर्याय नाहीं.**

**पहिली बेटी सोन्याची पेटी....**



**लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया**

# विविध माहिती

**नवें शेतकी कॉलेज**—तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत तिरुपती येथें एक शेतकी कॉलेज काढण्याचें आंध्र राज्य-सरकारनें ठरविलें आहे. आंध्र प्रदेशांत हैद्राबाद येथें एक व बापटिआ येथें एक अशीं दोन शेतकी कॉलेजें आहेत. तिरुपती येथील कॉलेजच्या स्थापनेसाठीं २५ लाख रुपये खर्च येईल. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत त्यांत ७२४ विद्यार्थी शिकतील.

**आंध्रमधील खताचा कारखाना**—आंध्र राज्यांत कोथागुडम् येथें काढण्यांत यावयाच्या खताच्या कारखान्याची प्राथमिक तयारी बऱ्याच प्रमाणांत झाली आहे. हा कारखाना सार्वजनिक मालकीच्या विभागांत काढण्यांत येणार आहे. ह्याशिवाय आणखी कारखाने काढण्याची परवानगी मागणारे दोन अर्ज सरकारकडे आले आहेत. त्यांपैकी एक अर्ज अमेरिकन कंपनीचा आहे.

**लोथल येथील उत्खनन**—अहमदाबादपासून ४५ मैलांवर लोथल येथें सांपडलेल्या प्राचीन सांस्कृतिक अवशेषांचें उत्खनन करण्याचें काम पुन्हा चालू करण्यांत आलें आहे. ह्या ठिकाणीं सांपडलेल्या बोटीच्या धक्क्याची लांबी ७१० फूट व रुंदी ११० फूट आहे. ४,००० वर्षांपूर्वीचे येथील रहिवासी चांगले दर्यावर्दी असावेत, असा तर्क करण्यांत आला आहे.

**पाकिस्तानांतील तागाच्या गिरण्या**—पूर्व पाकिस्तानांत तागाच्या चार नव्या गिरण्या काढण्यांत येणार आहेत. गिरण्यांसाठीं लागणारी यंत्रसामग्री ब्रिटनमधील कारखान्यांकडून मागविण्यांत आली आहे. पाकिस्तानांतील तागाची प्रत भारतापेक्षा चांगली असून तेथील गिरण्यांतील यंत्रसामग्रीहि अद्यावत् आहे. अलीकडे पाकिस्तानमधील तागाच्या मालाची भारताच्या मालाशीं जोराची स्पर्धा चालू आहे.

**भारतामधील कंपन्यांची संख्या**—भारतांत ३१ मार्च, १९६० रोजीं १ कोटी रुपयांपेक्षा अधिक मालमत्ता असलेल्या व संपत्ति-कराला पात्र असणाऱ्या कोट्यधीशांची संख्या २८ होती. पूर्वीच्या राजेरजवाड्यांपैकी अगर जमीनदार-सरंजामदारांपैकी अशांची त्यांतील संख्या फक्त १६ होती, अशी माहिती लोकसभेंत सांगण्यांत आली.

**साखरेच्या धंद्याचें वेजबोर्ड**—साखरेच्या कारखान्यांतील कामगारांच्या वेतनाचा विचार करण्यासाठीं मध्यवर्ती सरकारनें १९५७ सालीं वेजबोर्ड नेमलें होतें. त्याचा अहवाल आतां लोकसभेपुढें ठेवण्यांत आला आहे. बोर्डानें २०० साखर कारखान्यांना भेटी दिल्या व २ लाख कामगारांची गांठ घेतली. अहवाल ३०० पानें झाला आहे.

**पांढऱ्या वाघिणीचा प्रवास**—मध्यप्रदेशांतील रेवा येथील प्राणिसंग्रहालयांत असणारी पांढरी वाघीण विमानानें अमेरिकेला पाठविण्यांत आली. ही वाघीण वॉशिंग्टन येथील नॅशनल झूलॉजिकल पार्कमध्यें ठेवण्यांत येणार आहे. पार्कच्या डायरेक्टरांनीं ती विकत घेतली आहे. पांढऱ्या रंगाची वाघीण हा प्राणिसृष्टींतील एक चमत्कार गणला जात आहे.

**विजेच्या दरांत सवलत**—जोधपूर येथें नवें वीज निर्मिती-केंद्र उभारण्यांत आलें असून राजस्थान सरकारनें एंजिनिअरिंगच्या कारखान्यांना सवलतीच्या दरानें विजेचा पुरवठा करण्याचें ठरविलें आहे. २०,००० युनिटपर्यंत दर युनिटला १२ न. पैसे घेण्यांत येणार असून त्यापुढें अवघे ९ न. पैसे दर आकारण्यांत येणार आहे. ह्यापूर्वी दर युनिटला १९ न. पैसे आकारण्यांत येत असत.

**साबणाच्या धंद्याची अडचण**—मध्य प्रदेशांतील साबणाच्या छोट्या कारखान्यांना अडचणीला तोंड द्यावें लागत आहे. गेल्या कांहीं महिन्यांत कारखान्यांना लागणाऱ्या खोबरेल तेलाची टंचाई भासत असून त्याचे भाव एकसारखे वाढत चालले आहेत. साबणकारखान्यांच्या संघानें मध्यवर्ती सरकारकडे खोबरेल आयात करण्याची मागणी केली आहे. तेलाची किंमत ५५ रुपये मणापासून ११२ रुपयांपर्यंत चढली आहे.

**सतत मदत देण्याचा इरादा**—अमेरिकेचे भारतामधील वकील मि. एल्सवर्थ बंकर अहमदाबाद येथें बोलतांना म्हणाले कीं, भारतासारख्या वर्धिष्णु देशांना सतत मदत देण्याचें अमेरिकेचें धोरण आहे. आर्थिक स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं ह्या देशांनीं जे प्रयत्न चालविले आहेत त्यांना अमेरिकेचा नेहमींच पाठिंबा राहील. आर्थिक स्वातंत्र्य हें माणसाचें अनिवार्य भवितव्य आहे.

**अमेरिकन अर्थव्यवस्थेला मंदी!**—१९६१ च्या दुसऱ्या सहामाहींत अमेरिकन अर्थव्यवस्थेला थोडा काल आर्थिक मंदीला तोंड द्यावें लागेल असा इषारा एका प्रसिद्ध अमेरिकन अर्थशास्त्रज्ञानें दिला आहे. ह्या काळांत अमेरिकेंत बेकारी वाढेल व उत्पादनांतहि घट होईल असें त्यांचें म्हणणें आहे. सध्यां अमेरिकेंत ४० लाख बेकार आहेत.

**कालव्याची लांबी वाढविण्याचा निर्णय**—मराठवाड्यामधील पूर्णा पाणीपुरवठा योजनेंतील कालव्याची संकल्पित लांबी ३४ मैलऐवजीं ५० मैल करण्याचें महाराष्ट्र सरकारनें ठरविलें आहे. कालव्याची लांबी वाढविल्यामुळें ३५,००० एकर अधिक जमिनीला पाण्याचा पुरवठा होऊं लागेल. शिवाय त्यामुळें एक सहकारी साखर कारखाना काढणेंहि शक्य होईल.

**म्हैसूर राज्यांतील साखर-कारखाने**—म्हैसूर राज्यांतील साखरेचा धंदा वाढविण्याच्या हेतूनें राज्य सरकारनें ११ साखर-कारखाने काढण्याचें ठरविलें आहे. ज्या भागांत कारखाने नाहींत तेथें ते काढण्यांत येतील. त्यांतहि सहकारी साखरकारखान्यांना अग्रहक्क देण्यांत येईल. संकेश्वर येथील सहकारी कारखाना १९६१ मध्यें उत्पादन करूं लागेल.

**साप्ताहिक बंद होणार**—ब्रिटनमधील 'सन्डे ग्राफिक' हें रविवारीं निघणारें साप्ताहिक २९ जानेवारी, १९६१ पासून बंद करण्यांत येणार आहे. १९५९ सालापेक्षा ह्या साप्ताहिकाचा खप वाढला आहे. परंतु नुकसान जास्त वाढलें आहे. त्यामुळें हा निर्णय घेण्यांत आला आहे. त्याचा खप सुमारें ८,५०,००० प्रती आहे. साप्ताहिक १९१५ सालीं काढण्यांत आलेलें आहे.

**गाढवांची किंमत वाढली**—गुजरात राज्यांत विकासाचीं कामें झपाट्यानें चाललीं असल्यामुळें गाढवांच्या किंमती वाढल्या आहेत. परवां परवांपर्यंत एका गाढवाची किंमत ५० ते ७५ रुपये होती. परंतु आतां ती ३५० ते ४०० रुपयांपर्यंत चढली आहे. बांधकामाचें सामान वाहून नेण्याच्या कामीं ह्या जनावरांचा अधिकाधिक उपयोग करण्यांत येत आहे.

**२०,००० टन गहूं वाया गेला**—मध्यप्रदेश सरकारच्या गुदामांतून सांठवून ठेवलेला २०,००० टन गहूं पांढऱ्या मुंग्यांनीं पोखरल्यामुळें कुचकामी झाला आहे. सरकारजवळ असलेल्या एकूण सांठ्याच्या २० टक्के हा गहूं आहे. इतर राज्यांना शिल्लक गहूं देण्याच्या वाटाघाटीहि चालल्या होत्या. पण त्या वेळेवर संपल्या नाहींत व गहूं पडून राहिला.

# अर्थ

बुधवार, ता. ११ डिसेंबर, १९६०



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## सूर्यप्रकाशापासून शक्ति मिळविण्याचे प्रयत्न

मनुष्याच्या इतिहासांत यंत्रयुग सुरू झाल्यापासून यंत्रें चालविण्यासाठीं शक्तीला साहजिकच महत्त्व प्राप्त झालें. कोळसा, तेल, वीज, अणु, इत्यादींपासून आधुनिक शास्त्रांच्या साह्यानें उद्योगधंद्यांना शक्ति प्राप्त होते. त्यांपैकीं कोळसा व तेल ह्यांचे सांठे भूगर्भांत मर्यादितच आहेत. विजेच्या निर्मितीसाठीं पुष्कळदां कोळशावर अगर तेलावर अवलंबून राहावें लागतें. अणुशक्ति आतां हाताशीं आलेली असली तरी तिचा वापर मोठ्या प्रमाणावर होण्यास अद्याप बरींच वर्षें लागण्याची शक्यता आहे. शक्ति मिळविण्याचें आणखी एक साधन म्हणजे सूर्यप्रकाश. ज्या देशांतून वर्षाचे बरेच महिने सूर्यप्रकाश असतो त्यांना सूर्यप्रकाशापासून शक्ति उपलब्ध करतां आली तर फारच फायदा होईल. तथापि, ह्या बाबतींत अद्याप कोणत्याच देशाला फारसें यश आलेलें दिसत नाहीं. भारताचें संरक्षणखातें सूर्यप्रकाशाचा उष्णतेसाठीं उपयोग करण्याचे प्रयोग करीत आहे. कांहीं वर्षांपूर्वी भारतांत सोलर कुकर तयार झाल्याची वार्ता प्रसिद्ध झाली होती. पण पुढें हा कुकर बेपत्ता झाला. युरोपिय शास्त्रज्ञांची अशी खात्री आहे कीं, सूर्यप्रकाशापासून मिळणाऱ्या शक्तीचा मोठ्या प्रमाणावर उपयोग करणें शक्य कोटींतील आहे. ज्या देशांत कोळशाचे अगर तेलाचे सांठे नाहींत, त्यांना तर ही शक्यता खरी ठरल्यास शक्तीचा मोठा सांठा सांपडल्यासारखें होईल. घरांना उष्णता पुरविणें, पाकसिद्धि करणें, पदार्थ टिकविण्याच्या यंत्रांत उपयोग करणें, हवामान सुखद राखणें, इत्यादि अनेक प्रकारांनीं सूर्यप्रकाशाच्या शक्तीचा उपयोग करतां येईल. १९६१ सालीं शक्तीचीं नवीं साधनें शोधण्यासाठीं संयुक्त राष्ट्रसंघटनेतर्फे परिषद भरविण्यांत येणार आहे. ह्या परिषदेंत सूर्यशक्तीवर बराच विचार होणार आहे.

## आयुर्विमा कॉर्पोरेशनची पैशाची गुंतवणूक

आयुर्विमा कॉर्पोरेशननें गेल्या वर्षी ३१ डिसेंबर, १९५९ अखेरपर्यंत केलेल्या पैशाच्या गुंतवणुकीची माहिती प्रसिद्ध केली आहे. गेल्या वर्षी कॉर्पोरेशननें ८६·६८ कोटी रुपये खाजगी मालकीच्या विभागांत गुंतविले. भारतांत कॉर्पोरेशननें गुंतविलेल्या एकूण रकमेपैकीं २१·८ टक्के रक्कम खाजगी मालकीच्या विभागांत गुंतविलेली आहे. कॉर्पोरेशननें पैसे गुंतविण्याबाबत जी आंकडेवार माहिती दिली आहे त्यावरून असें दिसतें कीं सार्वजनिक मालकीच्या विभागांत कॉर्पोरेशननें एकूण ३११·६० कोटी रुपये रक्कम गुंतविली आहे. भारतामधील एकूण गुंतवणुकीशीं हें प्रमाण टक्केवारीच्या भाषेत ७८·२ असें पडतें. कॉर्पोरेशननें २१२ कोटी रुपयांची रक्कम मध्यवर्ती सरकारच्या रोख्यांत गुंतविली आणि ६४ कोटी रुपयांची रक्कम राज्य सरकारांच्या रोख्यांत गुंतविली. गुंतविलेल्या रकमेचें वर्गीकरण केलें तर असें आढळतें कीं एंजिनिअरिंगच्या उद्योगधंद्यांत ९·७ कोटी रुपयांची म्हणजे सर्वांत अधिक रक्कम गुंतविण्यांत आली आहे. त्यानंतर ९·२ कोटी रुपयांची रक्कम वीज-उत्पादनाच्या धंद्यांत गुंतविण्यांत आली आहे. त्यानंतर कापडाच्या गिरण्या ७·५ कोटी रुपये, लोखंड व पोलाद ६·८ कोटी रुपये, तागाच्या गिरण्या ४·२ कोटी रुपये, कागदाचे कारखाने ३·२ कोटी रुपये व संकीर्ण १५·७ कोटी रुपये असा अनुक्रम लागतो. औद्योगीकरणासाठीं लागणारा पैसा पुरविणारी एक महत्त्वाची संस्था म्हणून प्रगत देशांत आयुर्विमाव्यवसायाकडे पाहिलें जातें. राज्यवार पैसा—गुंतवणूक पाहावयाची झाली तर पूर्वीच्या मुंबई राज्यांत सर्वांत अधिक म्हणजे ३१·३९ कोटी रुपयांची गुंतवणूक झालेली आहे. त्यानंतर प. बंगालमध्यें २५·८ कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यांत आलेली आहे.

## जपानच्या व्यापारी आक्रमणाची जर्मनीला भीति

दुसऱ्या महायुद्धांत जबरदस्त हानि झाल्यामुळें खचलेला जपान आतां चांगलाच सावरला असल्याचें प्रसिद्धच आहे. जपानी उद्योगपती व व्यापारी ह्यांनीं आग्नेय आशिआंत व इतर मागासलेल्या आशिआई देशांत आपलें बस्तान बसविण्याचे यशस्वी प्रयत्न करावेत ह्यांत मोठी विशेष नवलाई नाहीं. परंतु आतां जपाननें आपला मोर्चा युरोपांतील बाजारपेठांकडे वळविला आहे. पश्चिम युरोपांतील देशांत आपला माल खपविण्याचे प्रयत्न जपान जोरानें करीत आहे. त्यामुळें जर्मनीसारख्या प्रगत देशांतील उद्योगपतींनाहि चिंता उत्पन्न झाल्याच्या वार्ता आहेत. पश्चिम युरोपच्या बाजारपेठांतून जपान कॅमेरे, दुर्बिणी, घड्याळें, ट्रॅन्झिस्टर रेडिओ सेटस्, टेलिव्हिजन सेटस्, इत्यादि माल पाठवितो. १९५९ सालीं जपाननें ह्या मालाची जितकी विक्री केली त्याच्या ४७ टक्के अधिक विक्री त्यानें १९६० च्या पहिल्या सहा महिन्यांतच केली आहे. पण हें व्यापारी आक्रमण येथेंच थांबलेलें नाहीं. युरोपमध्यें कारखाने बांधण्याचें कामहि मिळविण्याचा प्रयत्न जपानचे उद्योगपती करीत आहेत. १९६० सालीं युरोपमध्यें गेलेल्या जपानी प्रतिनिधि मंडळांची संख्या बरीच वाढलेली आहे. जपानच्या प्रतिनिधींनीं चार प्रमुख प्रश्नांवर आपलें लक्ष केंद्रित केलेलें आहे. (१) जपानी मालाच्या आयातीवरील निर्बंध काढून टाकविण्याचा प्रयत्न करणें, (२) आग्नेय आशिआसारख्या मागासलेल्या देशांतून युरोपिअन उद्योगपतींच्या सहकार्यानें कारखाने उभारण्याचें काम मिळविणें, (३) युरोपला लागणाऱ्या मालावरील कांहीं संस्कार जपानमध्यें करणें, आणि (४) युरोपच्या ज्या भागांत कामगारांचा तुटवडा आहे त्या भागांत जपानी कामगारांचा पुरवठा करणें. जपानच्या व्यापारी मोहिमेचेच हे चार पैलू आहेत.

## राजस्थानमध्यें मोठी यांत्रिक शेती

हिंदमधील अन्नधान्याचें उत्पादन वाढविण्यासाठीं यांत्रिक अवजारांच्या साह्यानें मोठ्या प्रमाणावर शेती करण्याचा उपाय सुचविला जातो. अशा प्रकारचीं शेती स्थापन करण्यासाठीं योग्य अशी जागा सुचविण्यासाठीं दामले कमिटीची नेमणूक करण्यांत आली आहे. ह्या कमिटीतर्फे राजस्थानमध्यें ३०,००० एकर

शेतीवर यांत्रिक शेती करण्यांत यावी असें सुचविलें जाण्याचा संभव आहे. यांत्रिक शेतीसंबंधीं कमिटीकडे बऱ्याच सूचना आल्या होत्या. त्या सर्वांत राजस्थान सरकारकडून आलेली सूचना चांगली आहे. राजस्थान सरकारनें अशा प्रकारच्या शेतांची एक साखळी तयार करण्यासाठी २,५०,००० एकर जमीन देऊं केली आहे. इतकी जमीन मिळविण्याच्या कार्मी फारशी अडचण भासणार नाहीं असें आश्वासनहि राजस्थान सरकारनें मध्यवर्ती सरकारला दिलें आहे. राजस्थान कालव्यापासून मिळूं शकणाऱ्या पाण्यामुळें पाण्याचा प्रश्नहि समाधानकारक रीतीनें सुटेल. नवीन यांत्रिक शेती सुरतगडनजीक गंगासागर ह्या ठिकाणीं स्थापण्यांत येण्याचा संभव आहे. सुरतगड येथील प्रचंड शेतीला रशियाचें साह्य मिळालेलें आहे. ह्या नव्या शेतीसाठीहि रशियाची मदत मिळण्याची शक्यता आहे. भारतामधील कांहीं शेतीचे तज्ज्ञ नुकतेच रशियाला जाऊन आले. रशिआ यांत्रिक शेतीसाठी लागणारीं अवजारें भारताला पुरविण्यास तयार आहे असा त्यांचा मह झाला आहे. गेल्या ऑगस्टमध्यें सुरतगड येथील उभ्या पिकांना जलप्रलयामुळें धोका पोंचला होता. अशा प्रकाराची पुनरावृत्ति होऊं नये म्हणून मध्यवर्ती सरकारचे व राज्य सरकारचे पाणीपुरवठा तज्ज्ञ उपाययोजना करणार आहेत. सुरतगडनजीकच्या नदीला पूर आल्यास राजस्थान कॅनॉलमध्यें पाणी सोडण्याची व्यवस्था करण्यांत येणार आहे.

---

## कागदाच्या कारखान्यांचें आधुनिकीकरण

इंडिअन पेपर मिल्स असोसिएशनचे अध्यक्ष श्री. एच. पी. सिंघी ह्यांनीं आपल्या भाषणांत भारतामधील कागदाच्या कारखान्यांतून आधुनिक यंत्रसामग्री बसविण्यांत यावी, व त्यांची उत्पादकशक्ति वाढविण्यांत यावी अशी सूचना केली आहे. ते आपल्या भाषणांत म्हणाले कीं, भारतामधील कागदाची मागणी एकसारखी वाढत चाललेली आहे. देशांत साक्षर लोकांचें प्रमाण वाढत आहे, त्याचप्रमाणें शिक्षणाच्या सवलतीहि वाढत आहेत. औद्योगीकरणाचा वेग वाढत असून व्यापारी उलाढालीहि चढत्या श्रेणीनें होत आहेत. अशा वेळीं कागदाचें उत्पादन वाढवून तो स्वस्त करण्याची अतिशय गरज आहे. १९५९ सालीं भारतामधील कागदाच्या व बोर्डच्या उत्पादनानें २,९२,००० टनांचा उच्चांक गांठलेला आहे. १९५८ सालीं हा आंकडा २,५३,०११ टन व १९५७ सालीं २,१०,१२६ टन असा होता. नियोजन समितीनें कागदाच्या उत्पादनाचें जें उद्दिष्ट १९५८ साठी ठरविलें होतें, त्याच्यापेक्षा ह्या धंद्याची आजची उत्पादकशक्ति अवघ्या १०,००० टनांनींच कमी आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत कागदाचा धंदा नियोजन समितीनें ठरविलेलें ३,५०,००० टनांचें उद्दिष्ट गांठील असें मानण्यास बराच आधार आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत नियोजन समितीनें ८,२०,००० टनांचें उद्दिष्ट ठेवलेलें आहे. असोसिएशननें सुचविल्यापेक्षा हा आंकडा ८०,००० टनांनीं कमी आहे. म्हणून कागदाच्या कारखान्यांना परवाने देतांना सरकारनें छोट्या कारखान्यांपेक्षा मोठ्या कारखान्यांना जवळ करावें. नाहींतर परवाने देऊनहि कागदाच्या उत्पादनाचें उद्दिष्ट गांठणें अवघड होऊन बसेल. कागदाच्या कारखान्यांची यंत्रसामग्री आयात करण्यासाठी परदेशीय चलन देतांना सरकारनें ह्या कारखान्यांना अग्रहक्क द्यावा.

---

## आर्थिक स्थैर्यासाठी करण्यांत आलेल्या सूचना

इंडिअन चेंबर ऑफ कॉमर्स ह्या संघटनेच्या तिमाही साधारण सभेंत अध्यक्षीय भाषण करतांना श्री. रूसी मोदी ह्यांनीं आर्थिक स्थैर्य साधण्यासाठी कांहीं महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. ते आपल्या भाषणांत म्हणाले कीं भारतापुढें महत्त्वाच्या असलेल्या आर्थिक समस्या पुढील आहेत. (१) लोकसंख्येच्या वाढीला आळा घालणें, (२) चलन वृद्धीचें व वाढत्या किंमतीचें दडपण कमी करणें, आणि (३) अन्नधान्याच्या उत्पादनांत मोठ्या प्रमाणावर वाढ करणें. देशाचें आर्थिक स्थैर्य साधावयाचें असेल तर वरील समस्या यशस्वी रीतीनें सोडविण्यांत आल्या पाहिजेत. पण त्या सोडवितांना एखाद्या विशिष्ट राजकीय तत्त्वज्ञानाप्रमाणेंच पावलें टाकण्यांत आलीं पाहिजेत असा हट्ट धरतां कामा नये. त्याचप्रमाणें, सार्वजनिक मालकीच्या विभागाच्या कारभारांत अधिक चोखपणा आणि कार्यक्षमता आणली गेली पाहिजे. त्यासाठी ह्या विभागांत काम करणाऱ्यांना चटकन् निर्णय घेण्याचे अधिकार दिले गेले पाहिजेत. योग्य वेळीं निर्णय घेण्यांत न आल्यामुळें अतोनात नुकसान झालेलें आहे. तेलाचे कारखाने, खताचे कारखाने, इत्यादि औद्योगिक संघटना उभारण्याबाबत हें विशेषत्वानें खरें आहे. खाजगी मालकीच्या विभागांतील लोकांनीं एकंदरीनें सार्वजनिक मालकीच्या विभागाची जरूरी मान्य केलेली आहे. हे दोन्ही विभाग सहकार्यानें वागले आणि त्यांनीं वस्तुनिष्ठ दृष्टि स्वीकारली तर तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ठरविण्यांत आलेलीं उद्दिष्टें गाठणें, प्रसंगीं त्यांच्याहि पुढें जाणें, शक्य आहे. तेव्हां खाजगी मालकीच्या विभागाकडे संशयानें पाहण्यांत अगर देशाच्या विकासासाठी त्यानें देऊ केलेली मदत झिडकारण्यांत अर्थ नाहीं.

---

## साखर-कामगारांच्या वेतनाबद्दल शिफारसी

भारतामधील साखर-कारखान्यांत काम करणाऱ्या कामगारांच्या वेतनाचा विचार करून शिफारसी करण्यासाठी मध्यवर्ती सरकारनें एक वेजबोर्ड नेमलें होतें. ह्या बोर्डाचा अहवाल नुकताच राज्यसभेला सादर करण्यांत आला. बोर्डानें अकुशल कामगारांना दरमहा ६०–१–६५ रुपये किमान मूलभूत वेतन देण्याची शिफारस केली आहे. अर्थात निरनिराळ्या भागांतील साखर-कारखान्यांतील साखर-कारखान्यांची वेतन देण्याची शक्ति लक्षांत घेऊन त्यांत फेरफार करण्याची सोय करण्यांत आली आहे. कामगारांना मिळणाऱ्या एकूण वेतनापैकी उरलेला भाग महागाई भत्त्याचा असेल. १९६० च्या नोव्हेंबर पासून शिफारसी अमलांत आणाव्या असें सुचविण्यांत आलें आहे. साखर–कारखान्यांचे चालक व कामगार ह्यांच्यांत कोणत्याहि प्रकारचा वाद नसण्याची इष्टता ध्यानीं घेऊन किमान पांच वर्षे तरी शिफारसींचा फेरविचार करण्यांत घेऊ नये असें अहवालांत म्हटलें आहे. बोर्डानें केलेल्या शिफारसी मान्य करण्यांत आल्या तर दरसाल दोन लाख साखर-कामगारांचा फायदा होणार आहे. अर्थात त्यामुळें साखरेच्या किंमतींत थोडीशी वाढ होणार आहे. पण ती दर मणामागें ४ ते ६ नये पैसे ह्यापेक्षा अधिक असणार नाहीं असा हिशेब करण्यांत आला आहे. सध्यां साखर–कामगारांचें किमान वेतन दरमहा रु. ४७ पासून ५८ पर्यंत आहे. बोर्डावर साखर–कारखाने व कामगार ह्या दोघांचेहि प्रतिनिधी होते. शिफारसींबाबत सरकारचे निर्णय जाहीर करण्यांत आले म्हणजे देशांतील १७१ साखर–कारखान्यांना ते अमलांत आणावे लागतील.

### छोट्या उद्योगधंद्यांना तांत्रिक मदत

अमेरिकेच्या टेक्निकल को-ऑपरेशन मिशनची परिषद् दिल्ली येथें भरविण्यांत आली होती. ह्या परिषदेंत भारताचे उद्योगमंत्री श्री. लाल बहादूर शास्त्री ह्यांनीं भाषण करून छोट्या उद्योगधंद्यांच्या विकासाबाबतचे आपले विचार व्यक्त केले. ते म्हणाले कीं छोट्या उद्योगधंद्यांना पुरेशी आर्थिक व तांत्रिक मदत मिळण्याची आवश्यकता फार आहे. भारतासारख्या अपुरा विकास झालेल्या देशांत ग्रामीण जीवनाचा आर्थिक विकास साधण्याचें काम अतिशय महत्त्वाचें आहे, आणि हें काम पूर्ण करण्यासाठी छोट्या उद्योगधंद्यांइतकें प्रभावी साधन दुसरें कोणतेंच नाहीं. ह्या उद्योगधंद्यांना तांत्रिक साह्याची निश्चिति वाटली पाहिजे. त्याचप्रमाणें, कच्च्या मालाचा पुरवठा आणि स्वस्त किंमतीची यंत्रसामग्री ह्यांचीहि तरतूद करण्यांत आली पाहिजे. परदेशीय भांडवलाचें भारत स्वागतच करतो. परंतु परदेशीय भांडवलाच्या मदतीनें जे उद्योगधंदे संयुक्तपणें उभारण्यांत येतील त्यांत बहुमताचें भांडवल भारतीयच असलें तर तें अधिक बरें होईल. सरकारच्या धोरणाशीं सुसंगतता राखण्यासाठीच केवळ असें असणें जरूर आहे असें नाहीं. येथील भांडवल गुंतविणाऱ्या लोकांचीहि तशीच इच्छा आहे. खतांचे कारखाने, प्लॅस्टिक, कागद, हत्यारांना लागणारें पोलाद, यांत्रिक हत्यारें, माती ढकलण्याचीं यंत्रें, बांधकामाचीं यंत्रें, इत्यादि प्रकारच्या कारखान्यांत परदेशी भांडवल मिळालें तर भारताला तें हवें आहे. अमेरिकेनें दिलेल्या तांत्रिक मदतीमुळें भारताचा पुष्कळ पैसा वांचला आहे. नाहींतर तांत्रिक साह्याच्या मोबदल्यांत हा पैसा परदेशीं गेला असता. तथापि, आर्थिक प्रगति वेगानें करण्यास नुसती यंत्रसामग्री उपयोगी पडणार नाहीं. यंत्रें वापरण्याचें कौशल्यहि आवश्यक आहे.

---

### हातमाग कापडासाठी नवीं डिझाइन्स

अखिल भारतीय हातमाग मंडळानें मुंबई मद्रास, कलकत्ता आणि वाराणशी येथील आपल्या कोष्टयांच्या सेवाकेंद्रांना डिझाइन्सबाबत सल्ला देण्याकरतां एका खास मंडळाची स्थापना केली आहे. या केंद्रांनीं तयार केलेल्या डिझाइन्सची पाहणी करून उत्पादकांना आणि ग्राहकांना तीं कितपत आवडतात व त्यांना याबाबत काय वाटतें ह्याबाबत हें मंडळ त्यांना मार्गदर्शन करील. त्याचप्रमाणें ह्या केंद्रांपाशीं असलेल्या साधनसामग्रीचा अधिक कार्यक्षमतेनें उपयोग करून घेऊन ग्राहकांना आवडणारे नमुने याहून अधिक चांगल्या प्रकारें कसें तयार करतां येतील आणि हातमागी कापड तयार करण्यासाठी कोणत्या सुधारलेल्या तंत्रांचा अवलंब करावा याबाबतहि हें मंडळ त्यांना सल्ला देईल. या मंडळाचे २० सदस्य मुंबई येथें, १५ कलकत्त्याला, १६ मद्रासला आणि ११ वाराणशीला राहतील. उद्योगधंदे, व्यापार, सहकारी संस्था, शैक्षणिक संस्था, इत्यादींमधील हातमागधंद्याची माहिती व अनुभव असलेल्या तज्ज्ञांची या मंडळांतील सदस्य म्हणून निवड करण्यांत आली आहे.

### बँकिंग कायद्यांत दुरुस्ती केल्याचा ठेवीदारांस लाभ

बुडणाऱ्या बँकांच्या ठेवीदारांच्या हितसंबंधांस अधिक संरक्षण देण्यासाठी, तसेंच त्यांस तांतडीनें प्राथमिक साह्य मिळावें म्हणून १९४९ च्या बँकिंग कंपन्यांचे ॲक्टांत १६ सप्टेंबर १९६० पासून दुरुस्ती करण्यांत आली आहे. या कायद्यांत अनुस्यूत करण्यांत आलेल्या ४१ ए (४१ ए) या नवीन कलमानुसार व दुरुस्त करण्यांत आलेल्या ४३ ए कलमानुसार बँका बुडीत काढण्याची पद्धत कांहीं बाबतींत अधिक सुलभ करण्यांत आली आहे. त्याचप्रमाणें बँकेचा कारभार गुंडाळण्याचा हुकूम काढल्याच्या दिवसापासून तीन महिन्यांत प्रत्येक ठेवीदारास अग्रक्रमानुसार जास्तींत जास्त २५० रुपयांपर्यंत रक्कम देण्याची तरतूद करण्यांत आली आहे.

---

### मुंबई शहराच्या आसपासच्या औद्योगिक विभागांत बँकिंगच्या सोयी

मुंबई शहराच्या आसपास असलेल्या औद्योगिक विभागांत बँकिंगच्या सोयी-सवलती उपलब्ध करून देण्यासाठी स्टेट बँक ऑफ इंडियानें विक्रोळी आणि भांडुप येथें उप-कचेऱ्या उघडण्याचें ठरविलें असून त्या लौकरच सुरू होतील.

---

### कोयना योजनेसाठीं जागतिक बँकेकडून कर्ज

जागतिक बँकेनें कोयना योजनेसाठी मंजूर केलेल्या एकूण २५० लक्ष डॉलर कर्जापैकी, ३१ ऑक्टोबर १९६० पर्यंत ७८·४ लक्ष डॉलर कर्ज मिळालें. उरलेलें कर्ज ३० एप्रिल १९६५ पर्यंत म्हणजे कर्ज-कराराची मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत हातीं येईल. या योजनेच्या दुसऱ्या अवस्थेसाठीहि जागतिक बँकेकडून कर्ज मिळण्यासाठी प्रयत्न होत आहेत.

---

### तिसऱ्या पंचवार्षिक योजनेसाठी २६०० कोटी रु. परकीय चलनाची गरज

या वर्षांत परकीय साह्यासाठी करण्यांत आलेले करार जमेस न धरतांहि दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटच्या वर्षासाठी निव्वळ १७० कोटी रु. च्या परकीय चलनाची आवश्यकता आहे. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेसाठी २६०० कोटी रु. परकीय चलन लागेल. यांत अमेरिकेच्या पी. एल. ४८० करारानुसार घ्यावयाच्या धान्यआयातीचा व तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या मसुद्याच्या चौथ्या प्रकरणांतील ३७ व ३८ या दोन परिच्छेदांत म्हटलेले परकीय साह्य-करार यांचा समावेश होत नाहीं.

---

### सायकलीच्या धंद्याला असलेलें संरक्षण १९६३ अखेरपर्यंत चालू राहणार

सायकलीच्या धंद्याला देण्यांत येत असलेलें संरक्षण सध्यांप्रमाणेंच आणखी ३ वर्षेपर्यंत म्हणजे ३१ डिसेंबर, १९६३ पर्यंत चालू ठेवावें ही टॅरिफ कमिशनची शिफारस सरकारनें स्वीकारली आहे.

---

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★


२५
वर्षें
अविरत
सेवा......
रौप्यमहोत्सव
१९३५ – १९६०
महाराष्ट्र राज्याच्या
औद्योगिक प्रगतीसाठीं
यथाशक्य सहाय्य करण्यास
बँक सिद्ध आहे.
दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.
चिं. वि. जोग
जनरल मॅनेजर
PARAMOUNT

**मुलांच्या आरोग्यासाठी योजना**—नाशिक येथील मेडिकल असोसिएशननें लहान मुलांना नाममात्र आकार घेऊन औषधें पुरविण्याची व वैद्यकीय उपचार करण्याची योजना आंखली आहे. कमी उत्पन्न असलेल्या लोकांच्या १२ वर्षांखालील मुलांच्या पुरतीच ती मर्यादित राहील. मुलांच्या पालकांनीं वार्षिक २२ रुपये तीन हप्त्यांत द्यावयाचे आहेत.

**भारी औद्योगिक कारखाने**—तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालांत प्रत्येक राज्यांत एक तरी भारी उद्योगधंदा काढण्याचा विचार भारत सरकार करीत आहे. हा कारखाना सार्वजनिक मालकीच्या विभागांत असेल. सर्व राज्यांच्या औद्योगिक विकासांत समतोलपणा राखण्याच्या प्रयत्नांचा हा एक भाग आहे.


**दिल्ली येथील मोठा गौळवाडा**—दिल्लीला दूधपुरवठा करणाऱ्या योजनेंतील एक टप्पा म्हणून एक मोठा गौळवाडा स्थापन करण्यांत आला आहे. दिल्लीच्या दूधपुरवठा योजनेला एकूण ३·३७ कोटी रुपये खर्च येणार आहे. सध्यांचा गौळवाडा शहराच्या बाहेर ३३ एकर जमिनीवर स्थापन करण्यांत आला आहे. तो जगांतील एक मोठा व अद्ययावत् गौळवाडा आहे.

**रशियाच्या साह्यानें औषधांची निर्मिति**—रशिआच्या तांत्रिक साह्यानें आधुनिक वैद्यक शास्त्रांतील चार औषधें निर्माण करण्यासाठी एक स्वतंत्र कंपनी काढण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. कारखान्यासाठी लागणारी जमीन व त्याच्याभोंवतीं बसविण्यांत येणारें शहर ह्यांचा खर्च सोडून सर्व कारखान्यांसाठी मिळून २८ कोटी रुपये भांडवल लागेल.

**पोस्ट खात्याला फायदा**—पोस्ट खात्यांत मेट्रिक पद्धतीचा वापर करणारें बिल लोकसभेनें मंजूर केलें आहे. पोस्टाचीं कार्डे तयार करण्यासाठी जो खर्च होतो तो लोकांनीं वापरलेल्या कार्डांच्या किंमतीनें भरून येत नाहीं; उलट सरकारला दरसाल सुमारें २ कोटी रुपये तोटा येतो. नव्या बिलाप्रमाणें मेट्रिक पद्धतीचीं ग्रॅमचीं वजनें सुरू झालीं कीं तोट्यांतील ४० लाख रुपये भरून निघतील.

**चहाच्या मळ्यांसाठी वेजबोर्ड**—चहाच्या मळ्यांत काम करणाऱ्या कामगारांच्या वेतनाचा विचार करून शिफारसी करण्यासाठी मध्यवर्ती सरकारनें वेजबोर्ड नेमलें आहे. वेतनाबद्दल शिफारसी करतांना बोर्डानें कामाचे तास, कामगारांचे प्रकार, मळ्यांचें स्थानिक वैशिष्ट्य, उत्पादनाप्रमाणें दाम देण्याची पद्धत, विकास पावणाऱ्या अर्थ-व्यवस्थेंतील ह्या धंद्यांचें स्थान, इत्यादि बाबी विचारांत घ्यावयाच्या आहेत.

**नेत्रदान यज्ञांतील कामगिरी**—मुंबईच्या दोराबजी टाटा ट्रस्टनें कारवारमधील अंकोला ह्या गांवीं नेत्रदानाची छावणी उघडली होती. ह्या छावणींत ९०० नेत्ररोग्यांवर उपचार करण्यांत आले. डॉ. क्रोनेनबर्ग ह्या अमेरिकन नेत्रवैद्यानें ९२ शस्त्रक्रिया केल्या. अशाच प्रकारच्या दोन छावण्या ह्यापूर्वी सौराष्ट्रांत मिठापूर येथें व कोल्हापूर नजीक गारगोटी येथें उघडण्यांत आल्या होत्या.

किर्लोस्कर

लोखंडी नांगर

भारी, मध्यम प्रतीच्या व रेताड जमीनीच्या सर्वोत्कृष्ट नांगरटीसाठीं निरनिराळ्या बनावटीचे लहान मोठे नांगर तयार होतात. आपल्या जमीनीच्या मगदुरा प्रमाणे योग्य अशा नांगराची निवड करा.

किर्लोस्कर ब्रदर्स लि.
किर्लोस्करवाडी
(जि सांगली)

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९१८]　　गिरगांव, मुंबई ४.　　[टेलि. : ७०१४

महाराष्ट्राची अग्रेसर सहकारी बँक

| | | | | |
|---|---|---|---|---|
| भाग भांडवल : | ... | ... | रु. | ८,५९,००० |
| रिझर्व्ह फंडस् : | ... | ... | रु. | ९,७३,००० |
| ठेवी : | ... | ... | रु. | १,३२,००,००० |
| खेळतें भांडवल : | ... | ... | रु. | १,६७,००,००० |

शाखा : फोर्ट, दादर, वरळी, वडाळा, माहीम, पुणें, बेळगांव.

स्त्रियांची शाखा : सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई.

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, लक्ष्मी रोड, पुणें २.

पोस्ट बॉक्स : ५११. ★ टेलिफोन : ४३८३.

### सूचना

दि. १ जुलै, १९५७ पासून बँकेनें सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचा दर दीड टक्क्यांवरून द. सा. द. शें. दोन टक्के असा केला आहे.

कायम ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातील.

| मुदत | | व्याजाचा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | : | $२\frac{१}{२}$ टक्के |
| २ वर्षे | : | $२\frac{३}{४}$ टक्के |
| ३ वर्षे | : | ३ टक्के |
| ५ वर्षे | : | $३\frac{१}{२}$ टक्के |
| १० वर्षे | : | ४ टक्के |

अल्प मुदतीच्या ठेवींच्या दरासंबंधीं माहिती बँकेच्या पुणें मुख्य कचेरींत पत्रानें अगर समक्ष मिळूं शकेल.

पुणें २.
ता. ३१-७-५७

वा. ग. आळतेकर
कार्यकारी संचालक



## बँक ऑफ पूना, लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. २५,००,००० |
| वसूल भांडवल ... | रु. ११,५०,००० |

—: संचालक मंडळ :—

१. श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, चेअरमन
२. डॉ. ना. भि. परुळेकर, व्हाईस चेअरमन
( संचालक, सकाळ )
३. श्री. फ्रामजी पी. पोचा
४. श्री. गणपतराव काळुराम नाईक,
B. Sc., B. E., LL. B.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

अल्प मुदत ठेवींवर आकर्षक व्याज.

...शाखा..

पुणें (१) सदाशिव पेठ, (२) डेक्कन जिमखाना (३) सांगली.

हेड ऑफिस व सांगली शाखेंत अल्प भाड्यांत लॉकरची सोय.

मुख्य ऑफिस :
४५५ रविवार पेठ, पुणें

गो. गं. साठे
मॅनेजर



## दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई

स्थापना : १९११

टेलिफोन,
नं. २५५४७४-७५

पोस्ट बॉक्स नं. ४७२
तारेचा पत्ता-कामर्सबँक

मुख्य कचेरी—९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई

चेअरमन : श्री. प्रा. ध. रा. गाडगीळ

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

| | |
|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | रु. १ कोटी, ४५ लक्ष |
| गंगाजळी व फंड | रु. ७२ ,, |
| ठेवी | रु. १४ कोटी, १९ लक्ष |
| खेळतें भांडवल | रु. २७ कोटी |

महाराष्ट्र राज्यांतील, शाखा व संलग्न बँका ३०४

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींसाठी चौकशी करावी.

चिं. द. दाते,
कार्यकारी संचालक.



स्थापना १९३६

## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि. सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस :

पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा शहर.

शाखा—१. मुंबई, फोर्ट, २. मुंबई, गिरगांव, ३ मुंबई, दादर, ४. नासिक, ५. पुणें, ६. बार्शी, ७. लोणंद, ८. कोल्हापूर, ९. हलकर्णी, १०. इचलकरंजी, ११. फलटण, १२. अकलूज.

| | | ३१ डिसेंबर, १९५९ |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | ४,७१,००० |
| ठेवी | रु. | १,८८,९२,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | २,१७,१५,००० |

मुदत ठेवींवरील व्याज :

| १ वर्ष ते २ वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें | दहा वर्षें |
|---|---|---|---|
| रु. ३·०० | रु. ३·२५ | रु. ३·५० | रु. ४·०० |

रु. एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात.

दराबाबत चौकशी करावी.

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | २·०० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | दरसाल दर शेंकडा | २·५० |
| चालू डिपॉझिट | दरसाल दर शेंकडा | ०·५० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी
बी. ए., बी. कॉम्., जन. मॅनेजर.

शं. ह. साठे,
बी. ए., एल्एल्. बी., चेअरमन


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.